Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III | ISSUE-IX | Sept. | 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# महात्मा गांधीजींची मुलोद्योगी शिक्षण योजना काळाची गरज

**धायगुडे बाळासाहेब विनायकराव**
एम.ए.( मराठी ), एम.एड्. डी.एस.एम
मु.पो. बनसारोळा ता. केज जि. बीड
मो. 8308404545/ 9421484949

## प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षणाचा सर्वांगीण विकास करून तत्कालीन शिक्षण पध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणणाऱ्या थोर विचारवंतामध्ये महात्मा गांधी यांचे नाव प्राधान्याने घ्यावे लागेल.तत्कालीन परिस्थितीचा विचार करून त्यांनी शिक्षणासंबंधी विचर मंथन केलेले आहे. त्यानुसार संपूर्ण देशासाठी शिक्षण योजनाच सादर केली. त्यांनी आपले शैक्षणिक विचार आपल्या हरिजन या वृत्तपत्रातून सादर केले. स्वातंत्र्यपूर्व काळातच नव्हे तर आजही मुलोद्योगी शिक्षण योजना भारताच्या दृष्टीने उपयुक्त आहे. यावरून आपल्याला महात्मा गांधीजींच्या व्यापक दूरदृष्टीची कल्पना येते

## गांधीजीचे शिक्षण विषय विचार -

केवळ साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे, शिक्षणाचा प्रारंभ देखील नव्हे आत्मा व मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तीतील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती हे शिक्षणाचे खरे ध्येय आहे. बालकाचा सर्वांगीण विकास म्हणजे शारिरीक, मानसिक आणि भावनिक विकास होणे म्हणजेच शिक्षण ही गांधीजीची 3H (Head, Hand, Heart ) म्हणजेच बुध्दी- ज्ञान सत्य, हात-शरिर कृती श्रम, भावना - प्रेम सौंदर्य अशा प्रकारची कल्पना मांडली.

बुध्दीला ज्ञानाकडे, भावनेला प्रेमाकडे आणि हाताला कृतीकडे नेणे म्हणजेच शिक्षण होय.

साक्षरता ही शिक्षणाचा शेवट नसुन सुरूवात ही नाही तर ती फक्त साधन आहे. ज्याव्दारे मनुष्याला शिक्षित केले जाउ शकते. साक्षरता स्वंय शिक्षण नाही. बालकाला शिक्षणात एका उपयोगी हस्त शिल्प (कला) शिकवावी. आणि ज्या वेळेस तो आपले शिक्षण सुरू करेल. तेव्हाच तो उत्पादन करण्यायोग्य बनला पाहिजे. मुलांच्या सर्वश्रेष्ठ गुणांचा विकास करण्यासाठी तसेच शिक्षण आनंदमय बनविण्यासाठी शारिरीक अभ्यास हस्तशिल्प, चित्रकला आणि संगीत यांना बरोबर शिकविले पाहिजे.

## शिक्षणाचा अर्थ व ध्येय -

1. सर्वांगीण विकास -
   शिक्षणात महात्मा गांधीनी व्यक्तिमत्वाच्या सर्व घटकांचा अंतर्भाव केला आहे. 3H (Head, Heart and Hand) ही कल्पना मांडून य सर्व अंगाच्या विकासावर भर घ्यावा असे त्यांनी सुचलिवले आहे.
2. अध्यात्मिक विकास -
   सर्वांगीण विकासात गांधीजीनी अध्यात्मिक विकासाला सर्वोच्च स्थान दिले आहे. याचे कारण त्यांची स्वत:ची जीवनाकडे पाहण्याची अध्यात्मवादी भुमिका, शिक्षणाचे अंतिम ध्येय व जीवनाचे अंतिम ध्येय यात ते अंतर मानीत नाही.

3. कृतीतून बौध्दीक विकास -

गांधीजींच्या मते शिक्षण ही केवळ ज्ञान मेंदूत कोंबण्याची प्रक्रिया नसुन सर्व ज्ञानेंद्रियांचा योग्य वापर आणि स्वावलंबी बनण्यासाठी उदनिर्वाहाचे योग्य साधन प्राप्त करून देणारी प्रक्रिया आहे. यावर त्यांचा विश्वास होता. जॉन डुई प्रमाणेच त्यांनाही ज्ञान आणि कृती यातील व्देत मान्या नव्हते. प्रत्यक्ष कृती केल्याने जे अनुभव प्राप्त होतात त्यातुन व्यक्तीला खरे शिक्षण मिळते. यावर त्यांचा विश्वास होता.

4. चारित्र्य निर्मिती -

महात्मा गांाधीजीच्या मते शिक्षणाचे ध्येय चारित्र्य निर्मिती असावे. याबाबत ते म्हणतात महान ध्येयाच्या प्राप्तीसाठी स्वत:ला विसरून जाण्याची क्षमता लावून ध्यैर्य, शक्ती आणि गुणांचा विकास करणे हे साक्षरतेपेक्षा जास्त महत्वाचे आहे.

5. जीवन उपयोगी शिक्षण -

जर एका वर्षाच्या प्रशिक्षणानंतर बालकांच्या श्रमाचे बाजार मुल्ये काहीच नसेल तर निश्चीत आपले मानसिक दिवाळे निघाले असे समजावे. ज्या शिक्षणातून आपल्या पायावर उभे राहून पोट भरण्याचे सामर्थ्य व्यक्तीमध्ये निर्माण होउ शकत नाही ते शिक्षण काय कामाचे ? त्यामुळे शिक्षणात त्यांनी हस्तव्यवसायांचा समावेश केला व आपल्या मुलोदयोगी शिक्षणाला जीवन शिक्षण किवा जीवनविद्या या नावाने संबोधले

**गांधीजीची मुलोद्योगी शिक्षण पध्दती -**

22 आणि 23 ऑक्टोबर 1937 साली वर्धा येथे गांधीजींनी एक शिक्षण परिषद भरविली व तेथे आपले शिक्षण विषयक विचार मांडले. त्यातुन एक शिक्षण योजना तयार झाली तीच मुलोद्योगी शिक्षण योजना होय.

**1. मुलोद्योगी शिक्षण योजनेची उदिष्टये - ध्येय**

1. आदर्श नागरिक निर्माण करणे.
2. सांस्कृतिक दृष्टीकोन वाढीस लावणे
3. व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास करणे
4. आर्थिक स्वावलंबन निर्माण करणे
5. सर्वोदय समाजाची निर्मिती करणे.

**2. मुलोद्योगी शिक्षण योजनेची ठळक वैशिष्टये**

1. नि:शुल्क व सक्तीचे शिक्षण -

   7 ते 14 वयोगटातील सर्व मुलामुलींना शिक्षण मोफत देण्याचे तसेच सक्तीचे करण्यात यावे शिक्षण हे सर्वासाठी खुले असावे शिक्षण हा प्रत्येक मानवाचा जन्मसिध्द अधिकार आहे.

2. मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम -

   तत्कालीन शिक्षणात इंग्रजीवर जास्त भर होता गांधीजीच्या मते प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले पाहिजे कारण आपले विचार विषयांबददल संकल्पना स्पष्टपणे विकसित करण्यासाठी मातृभाषा अत्यंत आवश्यक आहे.

3. शिक्षणाचा केंद्रबिंदू हस्तव्यवसाय असावा -

   कोणत्या तरी उत्पादनक्षम अशा हस्तव्यवसायाच्या माध्यमातून शिक्षण देण्यात यावे असे गांधीजीचे मत होते. अशा व्यवसायालाच ते मुलोद्योगी असे म्हणत हा व्यवसाय त्या त्या प्रदेशातील मानवी जीवनाशी संबंधीत असावा

4. शिक्षण स्वाश्रयाी असावे. -
गांधीजीचे मते प्रत्येक शाळा ही स्वाश्रयी असावी म्हणजे विद्यार्थी मुलाद्योगातून ज्या वस्तू तयार करतील त्या विकल्यावर येणाऱ्या उत्पन्नातून शाळेचा खर्च चालावा शिक्षकाचे वेतन व इतर खर्च त्यातुनच करावा कारण ब्रिटीश सरकार भारतीय जनतेच्या शिक्षणावर पैसा खर्च करणार नाही याची त्यांना पूर्ण कल्पना होती.

**3. मुलोद्योगी शिक्षणाची प्रमुख तत्वे / वैशिष्टये**

a. शिक्षणाचे माध्यम कोणते तरी उत्पादन हस्त व्यवसाय -
मूलोद्योगी शिक्षण हे कोणत्यातरी उपयोगी आधारावर हस्त कार्याच्या माध्यमातून दिले जाते अभ्यासक्रमाचे इतर सर्व विषयही या हस्तकार्याकडे केंद्रित करणारे असतील.

b. सुसुत्र व पूर्ण ज्ञान -
मुलोद्योगी शिक्षण पध्दतीमध्ये साऱ्या ज्ञानाचे केंद्र हस्तकला या विषयाचे अध्यापन केले जाते बालक एखादे काम करतो त्या प्रसंगात जे सिंध्दात येतील त्यांना बरोबर शिकवले जाईल उदा बालकाला पाती वर सुत कातते वेळी कापसाला कशी जमीन पाहिजे किती पाणी पाहिजे सुती उदयोगाचा विकास कसा झाला देशत सुती उदयोग कुठे कुठे आहेत सुताचा भाव इत्यादी माहिती सांगितली जातील.

c. शिक्षणाचे केंद्र बालक -
मुलोदयोगी शिक्षणामध्ये हस्त कलेस अत्यांधिक महत्व देण्यात आले होते तसेच शिक्षणाचे केंद्र बालकच राहावे.

d. नागरिकत्वाच्या गुणांचा विकास -
मूलोद्योगी शिक्षण पध्दतीमध्ये वर्गात सव्र बालक मिळून हस्तकला कार्य करतात. एकमेकांच्या बरोबर काम केल्यामुळे मुलांमध्ये परस्पर सहयोगाची भावना विकसित होते त्यांच्या मते जाती गरिब श्रीमंतीचा भेदभाव दूर होवून प्रेम व स्नेह भावना जागृती होते या प्रकारे सहकार्याच्या आधारे सामुहिक जीवनाचा धडा शिकतात.

e. आत्मनिर्भयतेची भावना -
शिक्षण आत्मनिर्भर बनविण्यासाठी गांधीजींनी मुलोद्योगी शिक्षणाची योजना अंतर्गत उत्पादन हस्तकला कार्याव्दारे शिक्षण सिंध्दातांचा समावेश केला या योजनेअंतर्गत ही आशा असेल की बालक जे साहित्य तयार करतील त्यांच्या किंमतीतून शिक्षकांचे वेतन काही प्रमाणात देता येतील यामुळे शिक्षण संस्था व बालकही स्वावलंबी बनेल.

f. शिक्षक व बालकास कार्य करण्यास स्वातंत्र्य -
मुलोद्योगी शिक्षण पध्दतीमध्ये बालक व शिक्षक दोघानांही कार्य करण्यास मोठया प्रमाणावर स्वातंत्र्यता होती कारण की मुलोद्योगी शिक्षणाचा उददेश आत्मक्रिया व्दारा बालकाचा सर्वांगीण विकास करणे हा होय.

**4. A मूलोद्योगी शिक्षणाचा अभ्यासक्रम -**

मुलोद्योगी शिक्षण पध्दतीच्या अंतर्गत 7 ते 14 वयापर्यंत मुले आणि मुली यांना एकत्रीत शिक्षण देण्यात येते आणि त्याचा अभ्यासक्रम एकच असे परंतु 5 वी वर्गाच्यानंतर मुले व मुलींच्या शाळा वेगवेगळया असत तसेच अभ्यासक्रमात पुढील विषयांचा समावेश होता. 1. पायाभुत कला - विविध हस्त व्यवसाय 2. मातृभाषा 3. गणित 4. सामाजिक शास्त्र 5. सामान्य विज्ञान 6. कला, संगीतृ चित्रकला 7. हिंदी 8. गृहशास्त्र 9. शारिरीक शिक्षण इत्यादी.

B **वेळापत्रक -**

मुलोद्योगी शाळेत प्रत्ये दिवशी कामाचे साडेपाच तास असत ज्यांची विभागणी खालील प्रमाणे आहे

1. आधारभुत हस्तव्यवसाय - 3 तास 20 मिनिटे
2. मातृभाषा - 40 मिर्ि निटे
3. सामाजिक अभ्यास तसेच सामान्य विज्ञान - 30मिनिटे
4. संगीत, चित्रकला, अंकगणित -40 मिनिटे
5. शारिरीक शिक्षण - 10 मिनिटे
6. मध्यांतर - 10 मिनिटे

मुलोद्योगी शाळाकडून एका वर्षात फक्त 288 दिवस काम करण्याची अपेक्षा केली गेली.

C **अध्ययन अध्यापन पध्दती -**

हस्तव्यवसाय हाच अभ्यासक्रम समवाय तत्वातून शिकवावा. कृतीतून शिक्षण किंवा कमवा आणि शिका या सुत्राचा त्यांनी पुरस्कार केला

D **स्वातंत्र्य व शिस्त -**

मूलोद्योगी शिक्षणामध्ये बालक व शिक्षक दोघांनाही कार्य करण्यात स्वातंत्र्यता होती. गांधीजींच्या मते मुलांना हस्तव्यवसायात गुंतवून इेवल्याने त्यांच्या अंगी शिस्त ही आपोआप बानली जाईल थोडक्यात त्यांनी स्वंयशिस्तीवर अधिक भर दिलेला आहे.

**5. मुलोद्योगी शिक्षण योजनेचे गुण -**

1. सक्तीचे व मोफत शिक्षण हा मुलोद्योगी शिक्षणाचा सर्वात महत्वाचा गुण आहे
2. मुलोद्योगी शिक्षण हे जीवनाशी निगडित असल्याने विद्यार्थ्यामध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण होते.
3. मुलोद्योगी शिक्षण हे उत्पादन कार्यातून दिले जात असल्याने हस्तकला प्राप्त झाली की ते संपत असे.
4. मुलोद्योगी शिक्षणाचे माध्यम मातृभाषा होय
5. मुलोद्योगी शिक्ष्णातून विद्यार्थ्यांमध्ये नागरिकत्वाची भावना निर्माण होते.
6. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय मूल्ये रूजतात.
7. मुलोद्योगी शिक्षणावर सत्य अहिंसा या गांधीजींच्या उच्च तत्वांचा प्रभाव होता.
8. या शिक्षणातून आपली संस्कृती जपली जात असे.

**समारोप -**

महात्मा गांधीजींच्या या मुलोद्योगी शिक्षण योजनेवर अनेक टिका सुध्दा झाल्या पंरतू या योजनेचा अभ्यास केल्यास आपल्याला आढळून येईल की ही मुलोद्योगी योजना आजही किती उपयुक्त होउ शकते. आज लोकसंख्येचा प्रस्फोट झालेला आहे तसेच सर्वच विद्यार्थ्यांना शिक्षण घेउन शासन आज नोकरी सर्वांना देउ शकत नाही त्यामुळे बेरोजगांराची संख्या दिवसेनदिवस वाढत आहे. काही बालके नैराश्याकडे जाउन व्यसनी बनत आहेत ते देशाच्या हिताच्या दृष्टीने चांगले नाही. त्यामुळे महात्मा गांधीजींच्या मुलोदयोगी शिक्षण योजनांचा आपण विचार करून शिक्षणक्रमाध्ये तसेच पध्दती मध्ये आवश्यक बदल केल्यास निश्चीतच रोजगार निर्मितीच्या माध्यमातून बेराजगारंची संख्या कमी करता येईल.

**संदर्भ सूची :-**

1. M.K. Gandhi (1937) – Basic Education, Navijivan Publishing House – Ahemdabad.
2. Basic Education (1941) -
3. www.mgandhi.org.in
4. Basic National Education (1938)-labusWardha 2nd Edition.